**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १५ /२०१५-१६/**१६१** दिनांक: **२६-११-२०१५**

**आदेश केस क्र. १५ /२०१५-२०१६**

| | | |
|---|---|---|
| १) श्री. साजिद गुलाबखान उस्ताद,<br>प्रोप्रा. सुपर ॲटो सर्व्हिसिंग सेंटर, १२४३/७५,<br>उद्यमनगर, कोल्हापूर. | : | अर्जदार. |
| विरुध्द | | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर<br>२) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, शहर कोल्हापूर.<br>३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>पुर्व उपविभाग, कोल्हापूर. | | विरुध्द पक्षकार |

**कोरम:-** १. श्री. एन. बी. बारसिंग, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,
महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. एन. बी. बारसिंग, सदस्य, सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

आज दि.२७.१०.२०१५ रोजी केस क्र.१५ व १६ ची सुनावणी झाली. यासाठी दोन्ही ग्राहक स्वत: हजर होते. महावितरणतर्फे अतिरिक्त कार्यकारी अभियंता पूर्व उपविभाग, कोल्हापूर श्री राजेंद्र हजारे व सहायक लेखापाल श्री हेमंत पोळ हे हजर होते. दोन्ही ग्राहकांचे तक्रारीचे विषय समान आहेत व ते महावितरणच्या एकाच शाखेचे व एकाच अधिकाऱ्याच्या संबंधित असल्यामुळे दोन्ही सुनावण्या एकाच वेळी घेण्यात आल्या आणि न्यायनिर्णय ही एकत्रच देत आहोत.

**<u>ग्राहक क्रमांक</u>**

१. श्री. साजिद गुलाबखान उस्ताद ग्राहक क्रमांक २६६६५१०५९०८९९/१
२. श्री. झाकीर गुलाबखान उस्ताद ग्राहक क्रमांक २६६५११९०१४२१/१
(झाकीरखान टायरगेज सर्व्हिसींग सेंटर)

**तक्रारीचे स्वरुप व ग्राहकाची मागणी.**

श्री साजिद गुलाबखान उस्ताद व श्री झाकिर गुलाबखान उस्ताद हे दोघेही गाडी धुण्यासाठीचे सर्व्हीसिंग सेंटर आपला व्यवसाय म्हणून चालवितात. महावितरणची सर्व बिले ते वेळच्यावेळी भरतात. त्यांची बिलाची वर्गवारी औद्योगिक/ इंडस्ट्रीयल अशी होती पण दि.१.८.२०१२ च्या टॅरिफ ऑर्डरप्रमाणे ती व्यापारी वर्गामध्ये समाविष्ट झाली. सदर वर्गवारी बदल हा त्यांच्या विज बिलामध्ये केला गेला नाही. त्यामुळे त्यांची बिले औद्योगिक प्रमाणे येत होती. दि.६/२/१५ ला ही बाब कंपनीच्या ध्यानात आली त्यावेळी ३.३.२०१५ रोजी साधारण एक महिन्यानंतर क्र.७२२/७२१ चे पत्र देवून त्यांनी पूर्वलक्षी प्रभावाने बिलाची मागील आकारणी नवीन व्यापारी वर्गवारीप्रमाणे करुन श्री साजीद गुलाब वस्ताद यांना रु.४२,१७०/- आणि श्री झाकीर खान गुलाब वस्ताद यांना रु.३३,३००/- भरावे असे नोटीस काढले. सदर रक्कमेवर दंड, व्याज अगर इतर आकार लावलेला नाही यावर सदर बिल रद्द व्हावे म्हणून अंतर्गत कक्षात दोघांनीही तक्रारी दाखल केल्या. त्यावर कक्षाचा निकाल औद्योगिक व व्यावसायिक दरातील फरकापोटी आकारणी करण्यात आलेले बिल रद्द करावे ही मागणी मान्य करता येत नाही अशा आशयाचा त्यांना आदेश देण्यात आले. हा निकाल दोघांनाही मान्य नसल्यामुळे त्यांनी आमचे फरकाचे देयक रद्द करावे अशी मागणी अ फॉर्ममध्ये केली व मानसिक त्रासापोटी रु.३,०००/- मिळावे अशी मागणी केली आहे.

**ग्राहक आणि महावितरण विरोधी पक्षाची भूमिका**

सदर देय रक्कम पूर्वलक्षी प्रभावाने ग्राहकाकडून घेणे योग्य नाही आणि आम्हास मान्य नाही हे ग्राहकानी तोंडी सांगितले तसेच त्यांनी आपले म्हणणे लेखी स्वरुपात अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण, पूर्वउपविभाग कोल्हापूर यांना १६.०३.२०१५ च्या पत्राने कळविले त्याची प्रतही कागदपत्राबरोबर जोडली आहे त्यामध्ये त्यांनी --

१. मा.आयोग निकाल केस क्र.२४/२००१ दि.१९/७/२०१४,
२. अपीलेट ट्रीब्युनल फॉर इलेक्ट्रिक यांचे समोरील अपील १३१/२०१३ चे संबंधित निकाल ७.८.२०१४
३. मा.आयोगाकडील केस क्र.५/२००३ दि.०२.०५.२००३ चे आदेश प्रत.
४. मा.विद्युत लोकपाल मुंबई केस क्र.१२४ / २०१४, २३.१२.२०१४
५. Appelate Tribunal for Electricity-Kerla Appeal No.१३१ of २०१३ dt. ७.८.२०१४

मा.मुंबई हायकोर्ट ऑर्डर रिट पिटीशन क्र.६७८३/२००९ दि.०५.०३.२०१० या तील कागदपत्रेही सोबत जोडली आहेत. महावितरणतर्फे राजेंद्र हजारे यांनी आपली बाजू मांडताना मानवी चुकामुळे जर कमी रक्कम वसूल केली गेली असेल तर ती पूर्वलक्षी प्रभावाने मागता येते. यावर मुंबई हायकोर्टातील मे.रोटो टेक्स पॉलीस्टर विरुध्द दादरा व नगरहवेली विद्युत कंपनीतील आदेशाची प्रत जोडली आहे. या निर्णयाचा आधार घेवून ग्राहकास दिलेले फरक बिल बरोबर असल्याचे सांगितले. आपली मागणी पुढे मांडताना त्यांनी महावितरणचे परिपत्रक क्र.पीआर/३/टॅरिफ/२५२३० दि.०५.०९.२०१२ चा संदर्भ विधी अधिकारी, कोल्हापूर यांचे पत्र क्र.९२०३ दि. १५.१०.२०१५ विधी सल्लागार, पुणे यांचे पत्र क्र. एलए/पीझेड/कोल्हापूर/५१५ दि.०६.१०.२०१५ ही पत्रे सादर केली आहेत.

प्रत्यक्ष चर्चे दरम्यान ग्राहक व अधिकारी दोघांनाही आपली बाजू मंचासमोर मांडली. सादर केलेली कागदपत्रे निकाल आणि प्रत्यक्ष मांडलेली कथने यांचा विचार करता खालील मुद्दे उपस्थित होतात.

१. ग्राहकाची तक्रार मान्य करता येईल का?

उत्तर नाही.

२. आदेश?

उत्तर अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारण मिमांसा

महावितरणतर्फे आपली बाजू मांडताना श्री हजारे यांनी वारंवार मानवी चुकीमुळे जर कमी रक्कम मागीतली गेली तर ती मागता येते आणि कंपनीच्या विधी सल्लागारांनी पण रक्कम मागता येते अशी पत्रे दिली आहेत असे सांगितले. यावर ग्राहकांनी आपली बाजू मांडताना सर्व कागदपत्रे निकाल सादर केले आहेत. महावितरण आणि ग्राहक यानी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता, माझे असे मत आहे की, कंपनीचे परिपत्रक क्र.१७५/२५२३० दि. ५/९/२०१२ नुसार सदर ग्राहकांची वर्गवाही ही औद्योगिक मधून व्यापारी मध्ये झालेली आहे, त्याप्रमाणे त्यांनी वीज वापर ही केलेला आहे. मा. विधी सल्लागार,पुणे यांनी आपले मत देताना पत्र क्र. LA/PZ/Kolhapur/५१५ दि.६/१०/२०१५ नुसार सदर ग्राहकाची दि. १.८.२०१२ पासून बदलेल्या वर्गवारीप्रमाणे वसूली व्हावी असे स्पष्ट म्हटलेले आहेत. तसेच त्यांनी असे म्हटले आहे की, "It is not a case of any reclassification, of the type of consumer as appears to be in other cases relied upon by the said consumers".

वरील सर्व विचारात घेता परिपत्रकांत नमूद केलेल्या दिनांकापासून म्हणजेच दि. १.८.२०१२ पासून योग्य ती फरकाची रक्कम ग्राहकाकडून एकदम वसूल न करता समान मासिक हप्त्यात वसूल करणेत यावेत, त्यांचेवर कोणतेही दंड, व्याज आकारणेत येवू नये. त्याचप्रमाणे सदर वर्गवारी बदलास विलंब का झाल याची सविस्तर चौकशी करुन, भविष्यात अशा प्रकारे महसूलाच्या वसूलीस बाधा निर्माण होईल असे घडू नये याची काळजी घ्यावी.

## आदेश

१. ग्राहकाची तक्रार फेटाळण्यात येत आहे.

२. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : २६-११-२०१५

(एन. बी.बारसिंग)
सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

मी मा. सदस्य सचिव यांचे मताशी सहमत नाही. मी माझे मत स्वतंत्रपणे देत आहे तो या निकालाचा भाग समजावा.

(पी.एस.बुरांडे)
ग्राहक सदस्य

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.